सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण - एक सखोल विश्लेषण

CA Parikshit K Bhadade

B com (Gold Medal) ,M com , DISA ,

DIRM (All India 1st Rank), FAFD ,

Mob No : 9890029333 ,91055 69555

Email: caparikshitbhadade@gmail.com

www.caparikshitbhadade.in

Disclaimer:

The views and opinions expressed in this presentation are my personal views and do not reflect the official policy or position of the Institute of Chartered Accountants of India (ICAI), the Reserve Bank of India (RBI), the Western India Regional Council (WIRC), or any of their respective branches.

- This presentation is intended for informational purposes only and should not be construed as professional advice. The presenter does not assume any responsibility for the accuracy, completeness, or relevance of the information presented. Please consult a qualified professional for specific advice tailored to your individual circumstances.

ब. कर्ज व्यवहार

१. कर्जाची तपासणी

२. वैयक्तिक व समूह महत्तम कर्ज मर्यादा :-

महाराष्ट्र,राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ यांच्याकडील पत्र दि. १५.०१.२०२० निर्णयानुसार बिगर कृषी पतसंस्थामधील एका सभासदाची व ग्रुप कर्जाची महत्तम मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार संस्थेस वैयक्तिक महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधिच्या १५% किंवा रु. ---- लाख यापैकि जी कमी असेल ती ग्रूपसाठी मर्यादा स्वनिधिच्या २०% किंवा रु. ---- लाख यापैकी जी कमी असेल ती आहे. सदर मर्यादेचे उल्लंधन करुन खालील सभासदांना कर्ज अदा केले आहे.

अ.क्र.	दिनांक	कर्ज खाते क्र.	कर्जदाराचे नाव	रक्कम
१				
२				

३. विनातारणी कर्ज मर्यादा :-

महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ यांच्याकडील पत्र दि. १५.०१.२०२० मधील निर्णयानुसार बिगर कृषी पतसंस्थामधील सभासदांसाठी सामान्य कर्ज मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार संस्थेस सामान्य कर्ज मर्यादा रु. ---- असून सदर मर्यादेचे उल्लंधन करुन खालील सभासदांना कर्ज अदा केले आहे.

अ.क्र.	दिनांक	कर्ज खाते क्र.	कर्जदाराचे नाव	रक्कम
१				
२				

कर्ज व्यवहार -

1. वैयक्तिक व समूह महत्तम कर्ज मर्यादा :-

महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ यांच्याकडील पत्र दि. १५.०१.२०२० निर्णयानुसार बिगर कृषी पतसंस्थामधील एका सभासदाची व ग्रुप कर्जाची महत्तम मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार संस्थेस वैयक्तिक महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधिच्या १५% किंवा रु.40 लाख - **After 19/9/25 रु.50 लाख - 2 Crores** यापैकि जी कमी असेल ती ग्रूपसाठी मर्यादा स्वनिधिच्या २०% किंवा रु.50 लाख यापैकी जी कमी असेल ती आहे.

Recent Circulars - 19/09/2025. (6 -Sections)

Recent Circulars - 30/04/2026

2. विनातारणी कर्ज मर्यादा :-

महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ

महत्तम कर्ज मर्यादा (Exposure norms) –

- नियामक मंडळाने दि.15/01/2020 रोजीच्या पत्रानुसार पतसंस्थासाठी महत्तम कर्ज मर्यादा निश्चित केलेल्या आहेत.
- त्याची अंमलबजावणी दि.31/03/2020 पासुन लागू केलेली आहे.
- त्यानुसार पतसंस्थांचे खेळते भांडवल, स्वनिधी, लेखापरीक्षण वर्ग व आर्थिक वर्षाचा नफा या बाबी विचारात घेऊन या निकषांच्या आधारे सदरच्या पत्रात परिशिष्ट क्र. 1 ते 10 मध्ये संस्थांचे वर्गीकरण करुन कर्ज मर्यादा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.
- त्यामध्ये सर्वसधारणपणे वैयक्तिक कर्ज मर्यादा निश्चित करताना ती संस्थेच्या स्वनिधीच्या 15% व ग्रुपसाठी स्वनिधीच्या 20% प्रमाणे महत्तम मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.
- उदा. लगतच्या वर्षा अखेर संस्थेचा स्वनिधी रु.20.00 लाख असल्यास 15 % प्रमाणे वैयक्तिक महत्तम कर्ज

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ,

तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - patsanstharegulatoryboard@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/ना. व ग्रा. पत/वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा/२३२१/२०२५ दिनांक : १९ सप्टेंबर, २०२५

परिपत्रक

विषय :- नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा नव्याने निश्चित करणे.

संदर्भ :- नियामक मंडळाचे पत्र क्र.पतसंस्था/सआ-५/नियामक मंडळ/सन २०२०/१७५, दि.१५/०१/२०२०

ठेवीची वर्गवारी	वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा	
	परिशिष्ठ क्र.१	
नवीन नोंदणीकृत संस्था व रु.५ कोटीपर्यंत ठेवी	सामान्य कर्ज	रू.१,००,०००/-
	वैयक्तिक महत्तम कर्ज	रू.५,००,०००/-
	एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज	रू.१०,००,०००/-
	परिशिष्ठ क्र.२	
रु. ५ कोटी पेक्षा जास्त ते १०० कोटी पर्यंत ठेवी	सामान्य कर्ज	रू.१,००,०००/-
	वैयक्तिक महत्तम कर्ज	रू.५०,००,०००/-
	एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज	रू.७५,००,०००/-
	परिशिष्ठ क्र.३	
रु.१०० कोटी पेक्षा जास्त ते ५०० कोटी ठेवी	सामान्य कर्ज	रू.१,००,०००/-
	वैयक्तिक महत्तम कर्ज	रू.७५,००,०००/-
	एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज	रू.१,००,००,०००/-
	परिशिष्ठ क्र.४	
रु.५०० कोटी पेक्षा जास्त ते १००० कोटी ठेवी	सामान्य कर्ज	रू.१,००,०००/
	वैयक्तिक महत्तम कर्ज	रू.१,००,००,०००/-
	एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज	रू.१,५०,००,०००/-

	परिशिष्ठ क्र.५	
रु.१००० कोटी पेक्षा जास्त ते २००० कोटी ठेवी	सामान्य कर्ज	रु.१,००,०००/-
	वैयक्तिक महत्तम कर्ज	रु.१,५०,००,०००/-
	एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज	रु.२,००,००,०००/-
	परिशिष्ठ क्र.६	
रु.२००० कोटी पेक्षा जास्त ठेवी	सामान्य कर्ज	रु.१,००,०००/-
	वैयक्तिक महत्तम कर्ज	रु.२,००,००,०००/-
	एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज	रु.२,५०,००,०००/-

२) उपरोक्त नमूद वैयक्तिक व समुह कर्ज मर्यादा लागू करणेसाठी कोणत्याही संस्थेस पोटनियम दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. तसेच उपरोक्त कर्ज मर्यादेमध्ये कोणत्याही स्तरावर (क्षेत्रीय स्तरावर) पोटनियम दुरुस्तीद्वारे बदल करता येणार नाही.

३) सहकार आयुक्तालयाचे कर्ज विषयक नियम याबाबतचे दि.२७/०६/२०२५ चे परिपत्रकातील सर्व अटी व शर्ती, सुचना लागू राहतील.

४) सामान्य कर्जामध्ये पगार तारण कर्जाचा समावेश राहील.

५) समान तारणावर विविध व्यक्तींना / संस्थांना कर्ज दिले असल्यास सदरचे कर्ज हे वैयक्तिक महत्तम कर्जामध्ये धरले जाईल.

६) कर्जदार व सहकर्जदार यांची कर्ज मर्यादा स्वतंत्र न धरता ती वैयक्तिक महत्तम कर्ज मर्यादेमध्ये धरण्यात येईल.

७) संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी त्यांचे लेखापरिक्षण अहवालामध्ये कर्ज मर्यादा व कर्जविषयक नियमांचे उल्लंघन याबाबत स्वतंत्र शेरे 'अ' भागामध्ये नमूद करावेत.

International Year
of Cooperatives

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ,
तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - patsanstharegulatoryboard@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/ना.व ग्रा.पत/वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा/सुधारीत/११८५/२०२६ दिनांक :३० एप्रिल, २०२६

परिपत्रक

विषय :- नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा नव्याने निश्चित करणे – सुधारीत परिपत्रक

संदर्भ :- नियामक मंडळाचे परिपत्रक दि.१५/०१/२०२० व दि.१९/०९/२०२५

५२. कर्ज विषयक नियम

कर्ज विषयक नियमावली सहकार आयुक्त कार्यालय यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकीय सुचनांनुसार लागू राहील. यामध्ये उपविधी दुरुस्तीद्वारे कोणतेही बदल करता येणार नाहीत.

वैयक्तिक व समूह तसेच कर्ज प्रकारानुसार महत्तम कर्ज मर्यादा, दुरावा इत्यादी निकष नियामक मंडळ वेळोवेळी निर्गमित करेल त्याप्रमाणे राहील. याकरिता उपविधी दुरुस्तीची आवश्यकता असणार नाही आणि उपविधी दुरुस्तीद्वारे कोणतेही बदल करता येणार नाहीत.

(५)	कर्जे आणि आगाऊ दिलेल्या कर्जाऊ रकमा :-	

	(१)	कर्जे आणि आगाऊ दिलेल्या कर्जाऊ रकमा यासाठी सभासदांकडून आलेले अर्ज नियमानुसार आहेत काय?		
	(२)	कर्जाच्या अर्जाची नोंदवही ठेवली असून ती अद्ययावत लिहिली आहे काय?		
	(३)	पोट-नियमानुसार, विविध प्रकारची कर्जे आणि पोटी द्यावयाच्या कर्जाऊ रकमा यासाठी व्यक्तिगत आणि एकुण काय मर्यादा ठरविल्या आहेत? त्या मर्यादा पाळल्या जातात काय?		
	(४)	(अ)	सभासदांच्या परतफेडीच्या क्षमतेची योग्य चौकशी करुन त्यांची पत-पात्रता ठरविली आहे काय?	
		(ब)	ठरवून दिलेल्या नमुन्यात पत-पात्रता आणि जामीन दायित्व नोंदवही (शुअर्टी लाययाबिलिटी रजिस्टर) ठेवली आहे काय?	
	(५)	कायदा, कानू आणि पोट-नियम यांतील तरतुदीनुसार कर्ज काटेकोरपणे दिली गेली आहेत काय?		

	(६)	संस्थेने मागणी, वसुली आणि बाकीची नोंदवही योग्यरीतीने ठेवली आहे काय?	
	(७)	योग्य चौकशी केल्यानंतर साधार कारणासाठी मुदतवाढी देण्यात येतात काय? अशा मुदतवाढीसाठी आवश्यक तेथे जमीनदारांच्या सम्मतीपत्रासहित अर्ज मिळविले आहेत काय?	
	(८)	(अ) सभासदाकडील थकबाक्या वसूल करण्यासाठी काय कारवाई केली आहे ते लिहा.	
		(ब) मागणी आणि येणे बाकी यांच्याशी थकबाकीचे शेकडा प्रमाण काय आहे?	
	(९)	संस्थेने करुन घेतलेले कर्जरोखे, वचनचिठ्ठया आणि अन्य कागदपत्र नियमानुसार आहेत काय? काही उणीवा असल्यास, नमुद करा.	
	(१०)	१९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायदयाच्या ४९ व्या कलमाप्रमाणे सभासदांकडून त्यांच्या पगारातून व मजुरीतून करारपत्रात मंजुर केलेल्या रकमा संस्थेच्या नावाने कपात करण्याबद्दल नोकरी देणा-यास प्राधिकार देणारी करारपत्रे करुन घेतली आहेत काय?	
	(११)	परतफेडी वक्तशीर आहेत काय? संस्थेच्या मागण्या पु-या करण्यासाठी नोकरी देणा-याने वेतन वा मजुरी यातून मासिक कपात नियमितपणे केल्या आहेत काय?	
	(१२)	अशी कपात केलेली रक्कम नोकरी देणा-याने संस्थेस वक्तशीरपणे दिली आहे काय? न दिलेली एकुण रक्कम असलयास लिही. अशा रकमा कोणत्या दिनांकापासून थकित आहेत ते लिहा.	
	(१३)	पूर्वीच्या कर्जाची परतफेड आणि नवीन कर्ज देणे यांत ठरवून दिलेले कालांतर यथावत पाळले जाते काय?	

	(१४)	सभासदांना दिलेल्या पास-पुस्तकातील नोंदी वैयक्तिक खतावण्यातील नोंदीशी तपासून पहा. अशा तपासलेल्या पास-पुस्तकांची संख्या लिहा.	
	(१५)	थकलेल्या व्याजाची रक्कम किती आहे? जर ती हिशेबात घेतली असेल तर तिची यथावत तरतुद केली आहे काय?	
	(१६)	संस्थेला येणे असेलेली कर्जे तपासा आणि त्यांचे बुडीत आणि संशयित असे वर्गीकरण झाले आहे काय ते पहा. अशा संशयित व बुडीत कर्जासाठी पुरेशी तरतूद केली आहे काय ते तपासा.	
	(१७)	संस्थेच्या व्यवस्थापन समितच्या वा संचालक मंडळाच्या सभासदांना आणि संस्थेच्या अधिका-यांना दिलेल्या आणि येणे असलेल्या कर्जाच्या रकमा लिहा.	

अनु क्रमांक	कोणाकडून येणे आहे	कर्ज, पतमर्यादा, अतिकाढ(ओव्हर ड्राफ्ट्स) इत्यादीद्वारा दिलेल्या रकमा		पैकी थकबाकी	
		मुद्दल	व्याज	मुद्दल	व्याज
१	२	३		४	

कोणत्या दिनांकापासून थकले ते दिनांक	त्यांचेवर जामीनदारीमुळे आलेले दायित्व		पैकी थकबाकी	
	मुद्दल	व्याज	मुद्दल	व्याज
५	६अ	६ब	७अ	७ब

दि.३१/०३/२०--अखेर संस्थेस खालीलप्रमाणे कर्ज येणे आहे.

अ. क्र.	कर्जप्रकार	गतवर्षा अखेर रु.	चालु वर्षा अखेर रु.	वाढ/घट
१.	सभासद कर्ज			
२.	सोने तारण कर्ज			
३.	वाहन तारण कर्ज			
४.	कॅश क्रेडीट कर्ज			
५.	ठेव तारण कर्ज			
६.	स्थावर मालमत्ता तारण कर्ज			
७.	व्यावसायिक कर्ज			
८.	सेवक कर्ज			
९.	इतर प्रकारची कर्ज			
१०.	एकुण -			

कर्जाची तुलनात्मक आकडेवारी पाहता अहवाल सालात कर्जात रु.-----वाढ झाली आहे. लेखापरीक्षण कालावधीत कर्जाचा व्याजदर ------ ते --------% आकारला आहे. सेवक कर्जास ------% व्याज आकारणी केली आहे. संस्थेचे कामकाज संगणकीकृत असल्याने कर्जे यादया संगणक प्रणालीद्वारे काढलेल्या आहेत/नाहीत. ताळेबंदाशी कर्जे यादया जुळत आहेत/नाहीत याबाबत अभिप्राय नमुद करावेत.

६. कर्जाची कालनिहाय विगतवारी

अ.क्र.	कर्जाचा कालावधी	दि.३१/०३/२०—अखेर येणे कर्ज	एकूण येणे कर्जाशी प्रमाण	शेरे
१	अल्प मुदत कर्ज			
२	मध्यम मुदत कर्ज			
३	दिर्घ मुदत कर्ज			
	एकूण			

७. तारणी विनातारणी कर्जे:-

अ.क्र.	कर्जाचा प्रकार	दि.३१/०३/२०—अखेर येणे कर्ज	पैकी तारणी कर्ज रक्कम	विनातारणी कर्ज रक्कम

११. संचालक व संचालक नातेवाईक कर्ज :- रु. -------/-

संस्थेने एकूण ------- संचालकांना रु. ------- कर्ज दिलेली आहे/नाही. तसेच -------------- संचालक नातेवाईकांना रु. ---------- कर्ज दिलेली आहे./नाही . एकूण कर्जापैकी --------- संचालक व ---

------ संचालक नातेवाईकांना उपविधि मधील नियम क्रमांक ------ चे उल्लंघन करुन विनातारणी /महत्तम कर्ज मर्यादाचे उल्लंघन करुन अदा केले आहे. संचालक व संचालक नातेवाईक कर्ज यांचेकडे एकूण येणे कर्जबाकी रु. ------------- असून पैकी थकबाकी रु.---------- आहे. थकबाकि वसूलीसाठी केलेल्या कारवाईचा उल्लेख करावा. संचालक व संचालक नातेवाईक कर्जाचे एकूण येणे कर्ज बाकीशी प्रमाण ------ % आहे. उपविधितील कर्ज नियमानुसार संचालक व नातेवाईकांना एकूण कर्जाच्या -------% पैक्षा जादाचे कर्ज अदा करता येत नाही.

३) **कर्ज रोखे व कर्ज व्यवहार तपासणी करताना निदर्शनास आलेले दोष;-**

लेखापरिक्षण कालावधीत नव्याने मंजुर केलेली व नुतणिकरण केलेली मोठ्या कर्ज प्रकरणांचे तपासणी करावी. तसेच कर्ज प्रकरणाची तपासणी करताना सर्वसाधारणपणे खालिल मुद्दे विचारात घ्यावेत.

१. संस्थेच्या मंजुर कर्ज धोरणानुसार कर्ज मंजुर केले आहे काय?
२. कर्जाचे नुतनीकरण असल्यास ते योग्य पध्दतिने केले आहे काय?
३. विहित अटी, शर्तीसह कर्ज मंजुरी आदेश दिले आहे काय?
४. वैयक्तिक महत्तम कर्ज मर्यादेचे उल्लंघन झाले आहे काय?
५. समुह कर्ज महत्तम मर्यादेचे उल्लंघन झाले आहे काय?
६. कर्जाचे तारण सुरक्षित व निर्वेध आहे काय?
७. सुरक्षीत व असुरक्षित कर्जासाठी पोटनियमाप्रमाणे निर्धारित प्रमाणात भाग कपात केली आहे काय?
८. संस्थेने कर्जातून नियमबाह्य कपाती केल्या आहेत काय?
९. जूनी कर्जे निरंक करण्यासाठी नविन कर्ज मंजुर केले आहे काय?
१०. कर्जदार नियमीत सभासद आहे काय?
११. कर्जास तारण घेतलेल्या मालमत्तेचे शासकीय मुल्यांककांकडून केलेले मुल्यांकन यथोचित आहे काय? तसेच तारण मालमत्ता निर्वेध आहे काय?
१२. कर्जास तारण घेतलेली मालमत्ता पुरेशी आहे का? व त्यावर संस्थेने बोजा नोंद केली आहे काय?
१३. कर्जमंजूरी-पाश्चात पाठपुरावा व कर्ज रक्कमेचा विनियोग या प्रमुख बाबींचा अंतर्भाव कर्ज धोरणामध्ये समावेशीत आहे काय?

(कर्ज प्रकारनिहाय दोष नमुद करावेत)

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	कर्ज प्रकार व खाते क्रमांक	कर्ज मंजुर दिनांक	कर्ज मंजुर रक्कम	दोष
१	xxxx	xxxxx	xxxx	xxxx	१. २. ३. ४. ५.

महाराष्ट्र शासन

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - patsanstharegulatoryboard@gmail.com

जा.क्र.सआ-५/पतसंस्था/नि.मं.सुचना/कर्ज विषयक नियम/१५१८/२०२५ दिनांक : २७ जून, २०२५

राज्यातील नागरी / ग्रामीण बिगर कृषी
सहकारी पतसंस्थांसाठी कर्ज विषयक नियम.

परिपत्रक

अ) कमाल कर्ज मर्यादा -

जोखीम केंद्रीकरण / ध्रुवीकरण टाळण्याच्या उद्देशाने एक विवेकपूर्ण उपाय म्हणून वैयक्तिक व समूह कर्जदार, विशिष्ट क्षेत्रांसाठी आणि असुरक्षित कर्जासाठी खालील प्रमाणे महत्तम कर्ज मर्यादा (Exposure Limit) राहील.

१) कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण विनातारणी / जामीनकी कर्ज ही संस्थेच्या एकूण कर्जाच्या १५% ते २०% या मर्यादेमध्ये राहील.

२) कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण गृह बांधणी कर्ज / घर दुरुस्ती कर्ज ही संस्थेच्या एकूण कर्जाच्या १५% ते २०% या मर्यादेमध्ये राहील.

३) कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण वैयक्तिक व व्यावसायिक नविन व जुन्या वाहन तारणावरील वितरित केलेल्या कर्जाची एकत्रित रक्कम ही संस्थेच्या एकूण कर्जाच्या १५% ते २०% या मर्यादेमध्ये राहील.

४) कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण कॅश क्रेडिट कर्जे ही संस्थेच्या एकूण कर्जाच्या १०% पेक्षा जास्त असणार नाहीत.

५) कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण माल तारण मुदत कर्ज ही संस्थेच्या एकूण कर्जाच्या १५% ते २०% या मर्यादेमध्ये राहील.

६) नागरी सहकारी पतसंस्था यांची कोणत्याही दिवशी संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ४९ चे अधीन राहून दिलेली एकूण मुदत कर्ज ही संस्थेच्या एकूण कर्जाच्या १५% ते २०% या मर्यादेमध्ये राहील.

७) या व्यतिरिक्त अन्य कोणतीही तारणी कर्जे (व्यावसायिक, शैक्षणिक इ.) तसेच सोने तारण, मुदत ठेव तारण, एल.आय.सी. तारण, एन.एस.सी. तारण इ. कर्जांना वरीलप्रमाणे कर्ज प्रकारानुसारची एकत्रित महत्तम मर्यादा लागू असणार नाही. तथापि, नियामक मंडळाने निर्धारीत केल्याप्रमाणे वैयक्तिक व समूह महत्तम कर्ज मर्यादा लागू राहील.

ब) एकूण कर्जामधील मोठ्या २० (टॉप २०) कर्जदारांच्या कर्जाचे कमाल प्रमाण :-

कोणत्याही दिवशी संस्थेकडील एकूण मोठ्या (टॉप २०) कर्जदारांच्या कर्जाचे कमाल प्रमाण संस्थेच्या एकूण कर्जामध्ये १५% पेक्षा जादा असणार नाही.

संस्थाना फोर क्लोजर चार्जेस / प्री - पेमेंट पेनल्टी आकारण्यास परवानगी नसून, संस्थांना फ्लोटिंग व्याज दर आकारता येणार नाही.

व्याज आकारणी ही कटमितीने (Reducing Balance Method) दिवसावर केली जाईल. सर्व प्रकारचे कर्जास व्याज आकारणी दरमहा केली जाईल. कर्जे उत्पादित असे पर्यंतच आकारणी केलेली व्याजाची रक्कम उत्पन्नात जमा करता येईल. अनुत्पादक कर्ज खाते (एन.पी.ए.) प्रकरणी व्याज रक्कम मुद्दलामध्ये जमा न करता थकीत रकमेवर स्वतंत्र व्याज आकारणी करण्यात यावी.

)हप्तेबंद कर्ज थकीत झाल्यापासून केवळ थकीत रकमेवर (संपूर्ण येणे रकमेवर नव्हे) द.सा.द.शे. २% प्रमाणे जादा / दंड व्याजाची आकारणी केली जाईल. मात्र कॅश क्रेडीट कर्ज खात्यावर अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) तारखेपासून संपूर्ण येणे रकमेवर द.सा.द.शे.२% प्रमाणे जादा / दंड व्याजाची आकारणी केली जाईल.

इ) कर्ज वितरण वैधानिक बंधने -

१) संस्थेच्या कर्मचाऱ्यांसह सर्व कर्जदार, सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार हे कर्ज मंजुरी पूर्वी संस्थेचे नियमित सभासद असणे आवश्यक असून, उपविधी मधील तरतुदीनुसार त्यांनी भाग धारण करणे अनिवार्य राहील. कोणत्याही परिस्थितीत कर्मचारी, कर्जदार, सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार यांना नाममात्र सभासद करून कर्ज देता येणार नाही.

२) गहाणखत करताना गहाणखतामध्ये तारण स्थावर मिळकतीमध्ये सर्व सह-हिस्सेदार यांची संमतीधारक म्हणून स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. याशिवाय सदर कर्ज प्रकरणी वचनचिठ्ठी व अन्य अनुषंगिक

होणाऱ्या दस्तऐवजांमध्ये तारण मिळकतीतील सर्व हिस्सेदार यांची जामिनदान म्हणून स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. कर्ज वसुली प्रकरणी वसुली दाखला /ॲवॉर्ड यावर सह-हिस्सेदार यांचे नाव समाविष्ट हाणेसाठी ही बाब आवश्यक आहे.

३) कर्जदार, सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार यांचे व्यवसायाचे ठिकाण, नोकरीचे ठिकाण अथवा निवासस्थान यापैकी किमान एक तसेच कर्जास देत असलेले मुळ व पूरक हे दोन्ही तारण संस्थेच्या विद्यमान कार्यक्षेत्रात असणे अनिवार्य राहील.

४) पगार तारण कर्जाचे बाबतीत कर्जदार, सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार यांचे मालक (एम्प्लॉयर) यांचे व्यवसायाचे ठिकाण संस्थेच्या विद्यमान कार्यक्षेत्रात असणे आवश्यक आहे.

५) विद्यमान संचालक व त्यांचे नातेवाईक यांना केवळ तारणी कर्ज अदा करावयाचे आहे, त्याचबरोबर त्यांना विनातारणी कर्जास कर्जदार, सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार म्हणून समाविष्ट करता येणार नाही.

६) विद्यमान संचालक व त्यांचे नातेवाईक यांना अदा केलेली एकत्रित कर्ज रक्कम कोणत्याही दिवशी संस्थेच्या एकूण कर्जाच्या ५% पेक्षा जादा असणार नाहीत. मुदत ठेव तारण, एल.आय. सी. तारण, एन.एस.सी. तारण, सोने तारण या कर्जांना वरीलप्रमाणे कर्ज प्रकारानुसारची एकत्रित ५% कमाल मर्यादा लागू असणार नाही.

७) संस्थेतील विद्यमान कर्मचारी, संचालक व त्यांचे नातेवाईक असल्यास जो पर्यंत ते संस्थेच्या सेवेत आहे तो पर्यंतच सेवानियम अथवा सेवक कर्ज नियमावली नुसार त्यांना कर्ज घेण्याचा अधिकार असल्याने, केवळ अशी कर्जे संचालक व नातेवाईक कर्जात समाविष्ट होणार नाहीत. मात्र ज्या कर्ज प्रकाराबाबतीत सेवानियम अथवा सेवक कर्ज नियमावलीत स्पष्ट उल्लेख नसेल अशी कर्जे किंवा सदर सेवकाची सेवा समाप्तीनंतर शिल्लक कर्जे ही विद्यमान संचालक व त्यांचे नातेवाईक कर्जामध्ये समाविष्ट होतील.

८) संस्थेच्या सेवेत असणारा विद्यमान कर्मचारी यास संचालक अथवा त्यांचे कोणत्याही नातेवाईकास सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार राहता येणार नाही.

११) कर्ज मंजुरीचे वेळी कर्जदार तसेच ज्यांची मिळकत तारण म्हणून घेतली आहे असे सह-कर्जदार व संमतीधारक यांची कायद्यानुसार देय असणारी वैधानिक देणी (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, आयकर, वस्तू व सेवा कर इत्यादी) जर तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत असतील तर अशा कर्ज प्रकरणी मंजुरी देऊ नये. तसेच किमान रु.१० लाख (वैयक्तिक अथवा समूह) किंवा त्या पेक्षा अधिक कर्ज वितरणानंतर कर्ज पूर्ण वसुल होईपर्यंत प्रतिवर्षी सर्व संस्थांनी वैधानिक देय रकम अद्ययावत दिल्याचे कागदोपत्री पुरावे दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. मात्र असे कागदोपत्री पुरावे संस्थेकडून

उपलब्ध झाले नसल्यास कर्जदार तसेच ज्याची मिळकत तारण घेतली आहे असे सह-कर्जदार व संमतीधारक यांचे सनदी लेखापाल (C.A) यांचेकडून अशा रक्कमा अद्ययावत अदा केल्याबाबतचा युडीन क्रमांकासह दाखला प्रति वर्षी घेणेत यावा.

१२) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत वैधानिक देणी देणे (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, आयकर, वस्तू व सेवा कर इत्यादी) या कारणासाठी कर्ज देऊ नये.

२१) कर्जदार, सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार यांचे अन्य कोणतीही बँक अथवा एन.बी.एफ.सी. मार्फत अद्ययावत 'सिबिल नोंदी' तसेच तारण मिळकतीबाबतीत स्वतःचे संस्थेमार्फत 'सेरसाई' (CERSAI) पोर्टल वरून नोंदी तपासून त्याची माहिती दप्तरी घेणेत यावी. तसेच कर्ज मंजुरीनंतर विहित मुदतीत सदर कर्जाची 'सेरसाई'(CERSAI - Central Registry of Securitisation Asset Reconstruction and Security Interest of India) कडे नोंद करावी. या शिवाय स्थावर तारण असल्यास महसूल खात्याकडेदेखील नोंद होणे आवश्यक राहील.

कर्ज नामंजूरी बाबत निर्णय कळविणे -

संचालक मंडळाने कर्ज नामंजूर केल्यास, कर्ज नामंजूर झाल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत अर्जदारास लेखी कळविण्यात येईल. नामंजूर कर्जाबाबत कर्ज नामंजूर दिनांकापासून ३ महिन्यापर्यंत सदर कर्जाबाबत पुर्नविचार केला जाणार नाही. कर्जास विहित मुदतीत पुर्नमंजुरी ही ज्यांचे अधिकारात मुळ कर्जास मंजुरी आहे त्यांचे किंवा त्यांचेवरील अधिकारातच दिली जाईल. कोणतेही कर्ज नामंजूर करण्याचा अधिकार हा केवळ संचालक मंडळास राहील.

अनुषंगिक खर्च

कर्ज मंजुरी वेळी किंवा कर्ज अदा केल्यानंतर कर्जप्रकरणासंबंधी निर्माण झालेले अथवा होणारे संशोधन व तपासणी खर्च, कायदा सल्ला शुल्क, मुद्रांक वसुली संबंधी झालेला खर्च इ. खर्चाची जबाबदारी कर्जदाराची राहील. असा खर्च संस्थेस करावा लागल्यासस सदर खर्च कर्जदाराच्या खात्यावर नावे टाकून त्यावर व्याज आकारणी केली जाईल.

कर्ज रकमेतून भाग रक्कम, जादा भाग, इमारत निधी, देणगी, प्रोसेसिंग फी अथवा अन्य कोणत्याही नावाने कोणतीही रक्कम परस्पर कपात करता येणार नाही.

कर्ज प्रोसेसिंग फी ही कर्ज मंजुरीपूर्वीच कर्जदाराकडून घेणे आवश्यक आहे. प्रोसेसिंग फी कर्ज मागणी रकमेच्या जास्तीत जास्त १% (जी.एस.टी. सह) परंतू कमाल रु.५०,०००/- पर्यंत घेता येईल.

प्रोसेसिंग फी बाबतचे धोरण सर्व कर्जदारांचे बाबतीत समान राहील. मुदत ठेव तारण, सोने तारण, एल.आय.सी. तारण, एन.एस.सी. तारण या कर्जासाठी प्रोसेसिंग फी आकारता येणार नाही.

कर्ज मंजुरी पत्र -

प्रत्येक कर्ज प्रकरणी कर्ज मंजुरीनंतर अर्जदार यास सविस्तर तपशिलासह कर्ज मंजुरी पत्र देणे अनिवार्य असून, मंजुरी पत्राचे कार्यालयीन प्रतीवर कर्जदार, सहकर्जदार, समंती धारक व जामीनदार यांची कर्ज मंजुरीतील सर्व अटी व शर्ती विना अट मान्य असल्याबद्दल लिखित संमती घेणे आवश्यक आहे.

कोणत्याही परिस्थितीत क्रॉस जामिनकी (एकमेकाला जामीन) घेण्यात येऊ नये. **उदा.** 'अ' चे कर्जास 'ब' जामीनदार, तर 'ब' चे कर्जास 'अ' जामीनदार असे असू नये. बचत गट अथवा अन्य कोणत्याही एकत्रित समूह किंवा गट कर्जात हे होऊ नये म्हणून किमान पाच जणांचा एक गट केल्यास क्रॉस जामिनकी टाळता येईल. **उदा.** क्रमांक १ ला क्रमांक २ व ३ जामीन, क्रमांक २ ला क्रमांक ३ व ४ जामीन असे केल्यास, शेवटी क्रमांक ५ ला क्रमांक १ व २ असे जामीन झाल्याने कोठेही क्रॉस जामिनकी होणार नाही.

कर्ज मागणी करणारा सभासद अगर जामिनदार हे कोणत्याही अन्य कर्जास, कर्जदार, सहकर्जदार, समंती धारक अथवा जामिनदार या नात्याने कोणत्याही संस्थेत अनुत्पादित कर्ज (एन.पी.ए.) खातेदार असता कामा नयेत.

संस्थेच्या कर्ज धोरणात स्पष्ट केल्याप्रमाणे, एका सभासदास त्याचे आर्थिक क्षमतेनुसार एकापेक्षा अधिक कर्जदारांना जामिनदार राहता येईल. मात्र संस्थाना सदर सवलत दिली असली तरी एका सभासदास जास्तीत जास्त चारच कर्जांना जामीन राहता येईल. तसेच संस्थेच्या कर्ज धोरणात असा उल्लेख नसल्यास अशा संस्थेला एका सभासदास जास्तीत जास्त दोनच कर्जांना जामीन घेता येईल.

महत्त्वाच्या सूचना :-

१) प्रत्येक पतसंस्थेने संचालक मंडळाचे मान्यतेने वरील सूचनांचा अंतर्भाव करून अधिक सुरक्षित कर्ज व्यवहार करण्यासाठी व जोखीम कमी करण्याच्या दृष्टीने सर्व समावेशक कर्ज धोरण तयार करणे आवश्यक आहे.

२) कर्ज वितरणामध्ये कर्ज कारण व त्यानुसार कर्ज विनियोग तसेच वास्तववादी उत्पन्न स्त्रोताचा विचार करून कर्ज परतफेड क्षमता व कर्ज वसुलीपोटी उपलब्ध तारणमुल्य विचारात घेऊन कर्ज धोरण / नियम तयार करून प्रत्यक्ष कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३) वैधानिक लेखापरीक्षकांनी कर्ज वितरणाबाबतीत सूचित मार्गदर्शक सूचना व प्रत्यक्ष कार्यवाहीमध्ये तफावत दिसुन आल्यास, अशा प्रकरणी संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी स्वतंत्ररित्या सदरबाबतची कारणमिमांसा उदाहरणासह लेखापरीक्षण अहवालात गंभीर आक्षेपांतर्गत भाग-अ मध्ये नोंदविण्यात यावी.

४) संस्थेने कर्जाच्या परतफेडीच्या अचूक तारखा, परतफेडीची वारंवारता, मुदत कर्ज व्याजदर, अधिस्थगन कालावधी दिला असल्यास सदरचा कालावधी, मुद्दल आणि व्याज परतफेडीचा सुरवातीचा दिनांक इत्यादी सर्व महत्वाचा तपशील कर्ज मंजुरी पत्र, गहाणखत तसेच सर्व आवश्यक त्या करारामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक असून, त्याच्या योग्य नोंदी संगणकीय प्रणालीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. या सर्व बाबींची तपशीलवार माहिती कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांना कर्ज वितरीत करतेवेळी संस्थेचे संबंधित कर्ज अधिकारी किंवा शाखा व्यवस्थापक यांनी देणे अनिवार्य आहे.

- जिंदगी की गुणवत्ता (Assets Quality):- १०० गुण

Particulars	Ratios	Marks
कर्ज व्यवहार:-	1. कर्ज प्रकरणी आवश्यक ते दस्तऐवज व कागदपत्रे घेऊन कर्जमाफी अर्ज परिपूर्ण भरलेला असल्यास	4 Marks
	2. कर्ज दाराचे संपत्ती स्थिती आर्थिक पद धारण मालमत्ता परतफेडीची क्षमता इत्यादी बाबत जननी करून टिप्पणी सादर करून व उपविद्येतील तरतुदीनुसार कर्ज मंजूर व वितरित केली असल्यास	4 Marks
	3. उपविधी मधील तरतुदी मन्या मग मंडळी निर्णयाप्रमाणे वैयक्तिक व समूह महत्त्व कर्ज मर्यादेचे (individual and group explore limit) पालन केले असल्यास	4 Marks
	4. ज्या कर्जास तारण घेणे आवश्यक आहे अशा कर्जाच्या बाबतीत पुरेसे व विक्रो योग्य धारण धारण मालमत्तेचा शोध अहवाल घेऊन मूल्यांकन करून कर्ज वितरित केली जात असल्यास	4 Marks
	5. त्यावर तारण मालमत्तेचे नोंदणीकृत गहाणखत करून कर्जबोजा नोंद केली जात असल्यास	4 Marks

- जिंदगी की गुणवत्ता (Assets Quality):- Loan Section - 40 गुण

Particulars	Ratios	Marks
कर्ज व्यवहार:-	6. उपविधीतील तरतुदीप्रमाणे एकूण कर्जामध्ये कर्ज प्रकरणानुसार कलाम कर्ज मर्यादेचे पालन केले असल्यास	4 Marks
	7. कर्ज मंजूर उद्देशाप्रमाणे कर्ज रक्कमेच्या विनियोगाची तपासणी केली असल्यास	4 Marks
	8. कर्जास तारण मालाची/ मालमत्तेची नियमित तपासणी होत असल्यास	3 Marks
	9. वितरित केलेल्या कर्जातून भाग रक्कम व्यक्तिरिक्त अन्य कपातील केल्या नसल्यास	3 Marks
	10. नियामक मंडळ निर्णयाप्रमाणे कर्जावरील कलाम व्याजदर मर्यादेचे पालन केले असल्यास	3 Marks
	11. उपविधी मधील कर्ज विषयक नियमास अनुसरून संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्ज व्यवहार निष्कर्ष बाबत देणे कर्ज मर्यादेचे उल्लंघन झाले नसल्यास	3 Marks

More Videos on YouTube for Banking /Co-operative/ RERA



CA Parikshit Bhadade

SUBSCRIBE



[www.caparikshitbhadade.in/ Co-operative /](http://www.caparikshitbhadade.in/Co-operative)

34 + Circulars

SR. NO.	PARTICULARS	DATE OF CIRCULAR	DOWNLOAD
1	एनपीए सुधारीत निकष	05-02-2024	Click Here to Download
2	CRAR Circular	01-02-2024	Click Here to Download
3	राज्यातील नागरी / ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पत संस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारित निकष करणेबाबत	27-03-2024	Click Here to Download
4	राज्यातील नागरी / ग्रामीण बिगर कृषी व पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांना माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) लागू करणेबाबत	23-08-2022	Click Here to Download
5	राज्यातील ग्रामिण व नागरी सहकारी पतसंस्थांकरीता वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा	04-04-2022	Click Here to Download
6	सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल मराठी भाषेत सादर करणेबाबत	25-05-2021	Click Here to Download
7	Audit Manual	27-11-2018	Click Here to Download


2025
BANK BRANCH
AUDIT HANDBOOK
By CA Parikshit Bhadade
+91 91055 69555
www.pariman.co.in
caparikshitbhadade@gmail.com

PRACTICAL GUIDE TO
BANK BRANCH AUDIT - 2026
BY CA PARIKSHIT BHADADE
A Coprehensive Guide to Conduct
Effective Bank Branch Audit
ADVANCES VERIFICATION | NPA CLASSIFICATION | LFAR REPORTING | RBI COMPLIANCES

CA Parikshit Bhadade

Questions & Answers

Mobile No. :- **+ 919890029333 / +91 91055 69555**
Email :- caparikshitbhadade@gmail.com

Thank You